स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद



रयत शिक्षण संस्थेचे,

राधाबाई काळे महिला महाविद्यालय,

अहमदनगर.



# प्रतिबिंब

मार्च २०१८ ते मे २०१८

विद्यार्थिनी संचलित वार्तापत्र... [ वर्ष पहिले : अंक : ४ ]

**संपादक मंडळ**

१. कु.मिसाळ प्रगती सुभाष S.Y.B.A.
२. कु.खाडे गीतांजली चंद्रकांत S.Y.B.A.
३. कु.खेत्रे अर्चना अर्जुन T.Y.B.Com.
४. कु.शिंदे नेहा राजाराम T.Y.B.B.A.(C.A.)
५. कु.पवार मोनाली संजय S.Y.BSc.
६. कु.लांडे पूनम अशोक M.Sc. II



**मार्गदर्शन**

१. डॉ. औटी बी.के.
२. डॉ. नगरकर एस.पी.
३. डॉ. करांडे एम.बी.
४. डॉ. निकाळजे बी.एस.

## संपादकीय...

कु.लांडे पूनम अशोक

### उत्सव लोकशाहीचा

आम्हा विद्यार्थिनींकडून चालविल्या जाणाऱ्या प्रतिबिंब या त्रैमासिकाचा या वर्षातील हा अखेरचा चौथा अंक. या अंकासाठी महाविद्यालयात झालेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेताना जानेवारी महिन्यात विद्यार्थिनींनी सादर केलेली पथनाट्ये, पोस्टर्स प्रदर्शने, पुस्तक प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम, अशा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची नोंद यात घेतली आहे. विशेषत : 'उत्सव लोकशाहीचा' ही थिम महाविद्यालयाने या काळात राबविली. जगातील लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्था असलेल्या अनेक देशांपैकी भारत हा सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे.आम्ही मुली या देशाच्या आता सुजान नागरिक आहोत. मतदानाच्या अधिकारापासून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समतेची फळे आम्ही चाखत आहोत. म्हणूनच 26 जानेवारी ते 30 जानेवारी दरम्यान मुलींनीच लिहिलेल्या व मुलींनीच तयार केलेल्या 'उत्सव लोकशाहीचा' या पथनाट्याचे प्रयोग महाविद्यालय, भुईकोट किल्ला, धोत्रे येथील दोन शाळा, टाकळी ढोकेश्वर महाविद्यालय, बाजारतळ, कर्जुले हर्या येथील इंजिनिअरिंग कॉलेज अशा पारनेर व नगर तालुक्यातील अनेक ठिकाणी सादर करण्यात आले. यातून व्यापक पातळीवर लोकप्रबोधन करून सुजान लोकशाहीच्या रक्षणासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. म्हणूनच या अंकासाठी 'उत्सव लोकशाहीचा' ही थीम घेण्यात आली. त्यास अनुसरुन महाविद्यालयात मुलींच्या विचार व भावनांचा आविष्कार करण्यासाठी चालविल्या जाणाऱ्या माई अंकास मिळालेल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा राज्यस्तरीय पुरस्कार, ग्रंथ प्रदर्शने व दुर्मिळ वस्तू व ग्रंथांची प्रदर्शने, शैक्षणिक सहली, पारितोषिक वितरण, विविध दिन अशा सर्व प्रकारच्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला आहे. खरे तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील सरांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'प्रतिबिंब' या त्रैमासिकाच्या माध्यमातून आम्हा विद्यार्थिनींस वर्षभर एक नाविन्यपूर्ण निर्मिती करण्याची प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले. तसेच संपादक मंडळातील सर्व सदस्य व डॉ.बी.के. औटी, डॉ. संजय नगरकर, डॉ. मनोहर करांडे, डॉ.भूपेंद्र निकाळजे सरांनी या सर्व अंकांसाठी त्यातील मजकूराची तपासणी करण्यापासून चुका दुरुस्त करण्यापर्यंत अनमोल असे मार्गदर्शन केले. या वर्षाचा निरोप घेताना 'प्रतिबिंब' हे त्रैमासिकाला दिलेले नाव सार्थ ठरवण्याचा प्रयत्न आम्ही कसोशीने केला. यात काही त्रूटी वा चूका राहिल्याही असतील परंतु त्यातूनच धडा घेऊन आपण पुढील वर्षासाठी सामोरे जाण्यासाठी तयार राहुयात.धन्यवाद....

## सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक - तय्यबा पठाण



विद्यापीठामध्ये वाणिज्य विद्याशाखेचे सुवर्णपदक प्राप्त तय्यबा पठाण हिचे अभिनंदन करतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील, प्रा.नासिर सय्यद, डॉ.संजय नगरकर, प्रा.महेश जाधव व प्रा.एस.एस.ठुबे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष 2016-17 च्या वाणिज्य शाखेच्या गुणवत्ता यादीनुसार राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेची तय्यबा पठाण ही विद्यार्थिनी सर्वोच्च गुण मिळवून सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. वाणिज्य शाखेच्या माजी विद्यार्थिनी कु. लिना जपे (08) व सोफिया पठाण (09) यांनी अहमदनगर महाविद्यालयातून एम.कॉम च्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. या सुयशाबद्दल यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन संस्थेचे सचिव प्रिं.डॉ. भाऊसाहेब कराळे, चेअरमन मा.डॉ.अनिल पाटील ,मा.अशोकराव काळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.आशुतोष काळे, सौ.स्नेहलताई शिंदे व उत्तर विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष मा.दादाभाऊ कळमकर यांनी केले. या विद्यार्थिनींना प्रा.नासिर सय्यद, विभाग प्रमुख प्रा. महेश जाधव, प्रा.निर्मला चौधरी, प्रा. शुभांगी ठुबे यांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभली.

## जागतिक पाणी दिवस

22 मार्च हा दिवस जागतिक पाणी दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवशी जगभरात अनेक प्रकारे पाण्याचे महत्त्व तसेच त्याचा वापर, त्यावरील उपाय याविषयी प्रबोधनात्मक, कार्यक्रम घेतले जातात.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागामध्ये जागतिक पाणी दिवस हा कार्यक्रम विभाग प्रमुख डॉ. सुमन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी विभागाच्या फलकावर पाणी या विषयावर अनेक प्रकारची वाक्ये लिहिली यात पाण्याचा वापर कसा करावा, पाणी बचत इ. प्रकारची घोषवाक्ये लिहिली.




तसेच प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुमन पवार यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच या कार्यक्रमात प्राणिशास्त्र विभागाचे डॉ.प्रितेश गुगळे, प्रा.कोमल सुपेकर, प्रा.पल्लवी देवकर यांनी सहभाग घेतला व घोषवाक्य लिहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## राधाबाई काळे देशाला महिला सैनिक पुरविणार



विद्यार्तिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

राधाबाई काळे महिला महाविद्यालयात सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु होणार असून, भविष्यात देशाला महिला सैनिक पुरविणारे हे महाविद्यालय ठरणार आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांनी केले.

महिला दिनानिमित्त आज राधाबाई काळे महिला महाविद्यालयात जिल्हा निवडणूक विभाग, रोटरी क्लब, स्नेहबंध ग्रुप, तसेच विविध शासकीय व सेवाभावी संस्थांतर्फे कार्यक्रम झाले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, नगर हे देशातील सर्वात मोठे लष्करी प्रशिक्षण केंद्र असून, महाविद्यालयाच्या या केंद्राच्या माध्यमातून देशात महिला सैनिक पुरविण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र पोलीस, केंद्रीय

व राज्य राखीव पोलीस, आसाम रायफल्स, औद्योगिक सुरक्षा दल, नौसेना, वायुसेना, पायदळ अशा विविध सुरक्षा क्षेत्रांकरीता भरती होण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी संरक्षणमंत्री शरद पवार यांच्या आदेशानुसार संस्थेने भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र स्थापण्यास परवानगी दिली आहे. त्यासाठी लष्करातील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन व शारीरिक तंदुरुस्तीसाठी मैदानाची तयारी सुरु आहे.

महिला दिनानिमित्त सावेडीत महिला मतदार जनजागृती फेरी काढण्यात आली. राष्ट्रीय खेळाडू स्वाती शिंदे, वक्तृत्व स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारी प्रगती मिसाळ यांचा गौरव करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर तर्फे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.कल्याणी चौधरी यांचे आरोग्यविषयक व्याख्यान झाले. राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या स्वाती शिंदे, तेजस्वी बनसोडे, श्रद्धा वामन, मोहिनी वामन यांचा राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## वक्तृत्व स्पर्धेत कु.प्रगती मिसाळ प्रथम



जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व श्री. छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये न्यू आर्ट्स महाविद्यालयाची विद्या कांडेकर आणि राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची प्रगती मिसाळ यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात या स्पर्धा झाल्या. परीक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार देशपांडे, प्रा. डॉ. संजय नगरकर व शैलेंद्र मसलेकर यांनी केले. या स्पर्धेसाठी विषय ऐच्छिक होते. स्पर्धकांना विषय मांडण्यासाठी प्रत्येकी पाच मिनिटे वेळ देण्यात आला होता. स्पर्धेस चांगला प्रतिसाद मिळाला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.देशपांडे यांनी केले. शिवानी संगमनेरकर व अनिकेत कर्डिले यांनी सूत्रसंचालन केले. यिन चे पालकमंत्री प्रवीण कोल्हे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे यिन अध्यक्ष अक्षय पवार, समन्वयक रणजित राजळे, सकाळ चे यिन समन्वयक सचिन कांबळे यांनी प्रयत्न केले.

स्पर्धेचा निकाल असा : प्रथम (विभागून) विद्या कांडेकर (न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नगर) व प्रगती मिसाळ (राधाबाई काळे महिला महाविद्यालय, नगर). द्वितीय - प्रगती मांडगे (राधाबाई काळे महिला महाविद्यालय, नगर) तृतीय - भरत मोहळकर (पेमराज सारडा महाविद्यालय, नगर). उत्तेजनार्थ - कार्तिकी दळवी (श्री. छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय). सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

## महिलांनी उत्तम आरोग्यासाठी काळजी घ्यावी : डॉ.पंडित

आजच्या धावपळीच्या जीवनात युवती व महिलांमधील आजारांचे प्रमाण वाढत आहे. काम व घर सांभाळण्याच्या कसरतीत आरोग्याच्या बाबतीत मात्र हलगर्जीपणा होतो. भविष्यातील उत्तम आरोग्यासाठी युवतींनी आजपासूनच आरोग्याची काळजी घ्यावी, असे प्रतिपादन डॉ. ऋषिकेश पंडित यांनी केले. स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे येथील राधाबाई महिला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात डॉ. पंडीत बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, स्नेहबंध फाऊंडेशनचे अध्यक्ष उद्धव शिंदे हे होते. डॉ.पंडीत म्हणाले, आजच्या युवती करिअरच्या नादात आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. तसेच अनेक वेळा चुकीचे निर्णय घेतले जातात. याचा परिणाम मुलींच्या आरोग्यावर होतो. बदलती जीवनशैली, सवयी यामुळे मुलींची प्रतिकारशक्ती कमी होत आहे.

चांगल्या आरोग्यासाठी मुलींनी पोषक आहारासोबतच योग, प्राणायाम, व्यायाम करावा. मासिक पाळी प्रसंगी



जागतिक महिला दिनानिमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशन आयोजित कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शन करतांना डॉ.ऋषिकेश पंडित व प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील, प्रा.माणिक विधाते

शरीरात कोणते बदल होतात, या बदलांना मानसिक, शारीरिकदृष्ट्या कसे सामोरे जावे, याविषयी डॉ. पंडीत यांनी मार्गदर्शन केले. मासिक पाळी हे प्रत्येक मुलीच्या आयुष्यात येणारे एक वळण आहे. या टप्प्यानंतर मुलीची स्त्री म्हणून जडणघडण होत असते. मात्र, मासिक पाळी म्हणजे बंधन, पायातील बेड्या असा विचार न करता हा टप्पाही सहजपणे स्वीकारत पुढे जायला हवे.

मनमुक्त जगण्याचा अधिकार प्रत्येक टप्प्यावर प्रत्येकीला असतो, त्यामुळे भांबावलेपणा दूर करुन मनमुराद जगा, अर्धवट माहिती ही कधीही घातकच आणि चुकीची दिशा दाखवणारी ठरू शकते, असे डॉ. पंडित म्हणाले, यावेळी मुलींच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. प्रास्ताविक डॉ.संजय नगरकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.शुभांगी ठुबे यांनी तर आभार उद्धव शिंदे यांनी मानले.

## महिला खेळाडू व प्राध्यापिकांचा गौरव



जागतिक महिला दिनानिमित्त शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राष्ट्रीय खेळाडू स्वाती शिंदे, विद्यार्थिनी प्रतिनीधी रूपाली मोरे व महिला प्राध्यापिकाचा गौरव करतांना प्रा.माणिक विधाते व माजी महापौर अभिषेक कळमकर

शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जागतिक महिलादिनानिमित्त राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय खेळाडू स्वाती शिंदे, राष्ट्रीय धावपटू तेजस्वी बनसोडे, श्रद्धा वामन व मोहिनी वामन यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी शिक्षिकांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, माजी महापौर अभिषेक कळमकर, महिला शहर जिल्हाध्यक्षा रेश्मा आठरे, माजी उपमहापौर दीपक सूळ, संजय झिंजे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र भांडवलकर, सारंग पंधाडे, डॉ. संजय नगरकर, प्रा. पायमोडे, प्रा. देशमुख मॅडम, अमोल कांडेकर, लहू कराळे, रोहित शिंदे, भरत गरुडकर, प्रतीक शिंगवी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी ठुबे यांनी केले. आभार सारंग पंधाडे यांनी मानले.



रोटरी क्लब अहमदनगरच्या वतीने विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन

## नगरमध्ये मतदार जनजागृती फेरी

शहरातील विविध महाविद्यालयातील युवतींचा मोठ्या प्रमाणात सहभाग, बेटी बचाव ते लोकशाही प्रक्रियेतील सहभागाबद्दल आवाहन करणारे फलक, तसेच विविध सामाजिक संस्थांच्याही सहभागामुळे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त काढण्यात आलेली जनजागृती फेरी लक्षवेधी ठरली. या फेरित 20 प्राध्यापिका प्राध्यापक महाविद्यालयाच्या 500 विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

मतदानप्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी मतदारयादीत नावनोंदणीचे आवाहन करीत जिल्हाधिकारी अभय महाजन यांनी महिला आणि युवतींना त्यांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन केले.

महिला दिनानिमित्त मुख्य कार्यक्रम माउली सभागृहात झाला. या वेळी जिल्हाधिकारी अभय महाजन, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.सुधा कांकरिया, सुचेता धामणे, कुस्तीपटू भाग्यश्री फंड, व्हॉलिबॉलपटू स्वाती शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुण आनंदकर, उपविभागीय अधिकारी उज्ज्वला गाडेकर, विभागीय वनाधिकारी कीर्ती जमदाडे - कोकाटे, पोलिस उपअधिक्षक अरुण जगताप, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) ज्योती कावरे, तहसीलदार (निवडणूक) सुधीर पाटील, तहसीलदार आप्पासाहेब शिंदे, गणेश मरकड आदी उपस्थित होते.



तहसिल कार्यालयापासुन काढण्यात आलेल्या फेरीला हिरवा झेंडा दाखविताना अपर जिल्हाधिकारी भानुदास पालवे. समवेत प्रांताधिकारी उज्वला गाडेकर तहसिलदार आप्पासाहेब शिंदे

कुस्तीपटू भाग्यश्री फंड, व्हॉलिबॉलपटू स्वाती शिंदे, वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या दीपाली कातोरे यांच्यासह प्रगती मिसाळ, निकिता दरंदले, ऋतुजा वडगावकर, रूपाली शिंदे, रांगोळी स्पर्धेतील अश्विनी भोसले, डॉ.संजय नगरकर यांचा सन्मान करण्यात आला. शुभांगी पालवे (स्केटिंग), ऐश्वर्या सप्रे आणि अक्षता सिनारे (बास्केटबॉल) यांनाही गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन कबड्डीपटू अंजली देवकर - वल्लाकट्टी यांनी केले. प्रास्ताविक कावरे यांनी केले, आभार उपविभागीय अधिकारी उज्ज्वला गाडेकर यांनी मानले.

## जागतिक महिला दिनानिमित्त भरगच्च कार्यक्रम



दै.सकाळ यिनच्या वतीने महाविद्यालयात पोवाडा सादर करतांना विद्यार्थिनी

जागतिक महिला दिनानिमित्त राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये आज भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिवसभर झालेल्या विविध उपक्रमांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा निवडणूक विभाग, दै.सकाळचा यीन ग्रुप, रोटरी क्लब, स्नेहबंध ग्रुप आदि विविध शासकीय व सेवाभावी संस्थांनी हे उपक्रम आयोजित केले. सकाळी 8 वाजता सावेडी परिसरात महिला मतदार जनजागृती रॅली झाल्यानंतर माउली सभागृहामध्ये झालेल्या जाहीर कार्यक्रमात महाविद्यालयाची राष्ट्रीय खेळाडू कु. स्वाती शिंदे, वक्तृत्व स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या कु.प्रगती मिसाळ व या विद्यार्थिनींचा प्रतिनिधी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमानंतर दै. सकाळच्या यीन ग्रुपने महाविद्यालयाच्या प्रांगणात महिला सबलीकरण या विषयावर पथनाट्य सादर केले. तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर च्या वतीने क्रीडा शिक्षिका श्री व श्रीमती खैरनार यांनी मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले. तसेच स्त्रीरोगतज्ञ डॉ. कल्याणी चौधरी यांनी आरोग्य विषयक जनजागृतीपर व्याख्यान दिले. दुपारनंतर शहर राष्ट्रवादीच्या वतीने प्रा.माणिक विधाते यांनी महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांचा व राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या कु. स्वाती शिंदे, कु. तेजस्वी बनसोडे, श्रद्धा वामन व मोहिनी वामन या खेळाडुंचा माजी महापौर अभिषेकजी कळमकर यांच्या हस्ते सन्मान केला. तसेच स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने मा.उद्धव शिंदे यांनी

डॉ.ऋषिकेश पंडित यांचे महिलांचे आरोग्यविषयक प्रश्न या व्याख्यानाचे आयोजन केले. दिवसभर झालेल्या या विविध कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापिका, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. या कार्यक्रमांचे नियोजन प्रा.डॉ. संजय नगरकर यांनी केले. तर मार्गदर्शन प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील, कनिष्ठ विभागप्रमुख प्रा. किसनराव पायमोडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. रामचंद्र राऊत, प्रा. अमोल बुचुडे, प्रा. योगेश तवर व महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा. दशरथ शेळके व प्रा. शुभांगी ठुबे यांनी केले. आभार विद्यापीठ प्रतिनिधी कु. रुपाली मोरे हिने मानले. याप्रसंगी माजी उपमहापौर दिपक सूळ, मा. संजयजी झिंजे शहर राष्ट्रवादी अध्यक्षा रेश्माताई आठरे, रोटरी क्लबचे अध्यक्ष अॅडव्होकेट अभयराजे तसेच सदस्य सौ. देशपांडे, सौ. बिहानी मॅडम, सौ.अजिता चोभे, प्रियंका पारिख व मनीष नय्यर आदि उपस्थित होते.

## स्वाती शिंदेची राष्ट्रीय व्हॉलिबॉल संघात निवड



यशस्वी खेळाडूं सोबत संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे, प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील, फिजिकल डायरेक्टर प्रा.बुवासाहेब ढेरे व प्रा.संजय अनभुले

येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची राष्ट्रीय खेळाडू स्वाती शिंदे हिची राष्ट्रीय व्हॉलिबॉल संघात निवड झाली आहे. नुकतेच केरळ राज्यातील कोझीकडे येथे पार पडलेल्या 66 व्या राष्ट्रीय पातळीवरील व्हॉलिबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने अतिशय उत्कृष्ठ खेळ करुन ब्रॉन्झ पदक पटकावले. उपांत्य सामन्यात तामिळनाडूच्या संघाला हरवत महाराष्ट्र संघाने तृतीय स्थान पटकावले. आता भारतीय व्हॉलिबॉल महासंघ कप स्पर्धा विजयवाडा येथे होणार असून या स्पर्धेत स्वाती शिंदे खेळणार आहे.जिल्ह्यात राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेत पदक मिळविणारी स्वाती ही पहिलीच खेळाडू आहे. निवडीबद्दल तिचे संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ.भाऊसाहेब कराळे, मा.आ.दादाभाऊ कळमकर, मा.आ.अशोक काळे, मा.आशुतोष काळे, प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.

## एक मूठ धान्य, एक ओंजळ पाणी - पक्षांसाठी....



महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये पक्षांसाठी धान्य व पाणी

महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसरामध्ये पक्षांसाठी धान्य व पाणी यांची सोय केली आहे. महाविद्यालय परिसरातील विविध ठिकाणी धान्य व पाणी साठवण्याचे उपकरण बसवण्यात आले. पक्षांसाठी हा उपक्रम लाभदायक आहे वाढत्या शहरीकरणामुळे पक्षांसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे महाविद्यालय परिसरामध्ये पक्षांचे थवे दिसून येत आहे. विद्यार्थिनी पक्षांचे निरिक्षण करतात व संवर्धनाची काळजी घेत आहेत. यासाठी प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुमन पवार व डॉ.प्रितेष गुगळे हे त्यांना सहकार्य करतात.

## केमयाड स्पर्धेमध्ये अश्विनी भोसलेचे यश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रसायनशास्त्र विभागा अंतर्गत घेण्यात आलेल्या 27 केमयाड स्पर्धेमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. भोसले अश्विनी बबन हिने लक्षणीय यश संपादन केले.

## प्लास्टिक मुक्त परिसर



महाविद्यालया समोरिल परिसरामध्ये प्लास्टिक मुक्त करतांना विद्यार्थीनी

महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी प्लास्टीक मुक्त परिसर या उपक्रमाद्वारे महाविद्यालयाच्या आसपासच्या परिसरामध्ये प्लास्टीकचे धोके व प्लास्टीक वापरामुळे होणारी पर्यावरणाची हानी याबाबत जागृती केली. प्लास्टीकची पिशवी न वापरणे व त्याऐवजी कापडी पिशवी वापरणे, कागदी पिशवीचा आग्रह धरणे याबाबत जागृती केली व आसपास परिसरातील प्लास्टीकच्या वस्तू गोळा करून ते आरोग्याला कसे हानिकारक आहे याबाबत जागृती करण्यात आली.

## सोनई येथे कृषि प्रदर्शनास विद्यार्थिनींची भेट



सोनई येथे कृषी प्रदर्शनास महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी भेट दिली व आधुनिक शेती करण्यासाठी नवनवीन औजारे, सौर ऊर्जा, सेंद्रिय खते याबाबत विद्यार्थिनींनी माहिती घेतली भविष्यामध्ये आधुनिक पध्दतीने शेती कशी केली जाते या बाबत माहिती घेतली.

## रयत शिक्षण संस्थेचे प्रिं.श्री.आर.डी. गायकवाड पारितोषिक कु. मयुरी हापसे हिस...

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा शिका योजनेमध्ये काम करून श्रमाची प्रतिष्ठा जोपासताना ज्ञानाची उंची सुद्धा वाढविणे आवश्यक असते. त्याचे प्रत्यंतर नुकतेच आले. रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. मयुरी हापसे या विद्यार्थीनीस रयत शिक्षण संस्थेचे प्रि.श्री.आर.डी. गायकवाड पारितोषिक मिळाले संस्थेच्या सर्व महाविद्यालयामधून कमवा व शिका योजनेमध्ये काम करून विद्यापीठ पदवी परीक्षेत सर्वप्रथम आल्या बद्दल संस्थेकडून हे पारितोषिक तीला मिळाले सन्मानपत्र व रोख 1125 असे या पारितोषिकाचे स्वरूप होते.

## आंतर महाविद्यालयीन फोटोग्राफी स्पर्धा



महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु.नम्रता गाडळकर T.Y.BSC व कु. उमा साबळे T.Y.BSC या विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन फोटोग्राफी स्पर्धेमध्ये यश संपादन केले.

## महाविद्यालयात वेस्ट फूड पासून बायोगॅस





बायोगॅस निर्मिती प्रकल्प

कॉलेजच्या कँटिनमधील वेस्ट फूड हे ओला कचरा म्हणून कचराकुंडीमध्ये टाकून देण्यापेक्षा त्याद्वारे बायोगॅस निर्मितीचा प्रकल्प रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयाने उभारला आहे. प्रदूषणावर मात आणि पैशाची बचत करणारा हा प्रकल्प खऱ्या अर्थाने शहरातील इतर हॉटेल व्यावसायिकांसमोर आदर्श निर्माण करणारा आहे.

सावेडी येथील कचरा डेपो बंद करा, यासाठी नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस व पोखर्डी ग्रामस्थांनी आंदोलन केले. त्यामुळे नगर शहरामध्ये कचराकोंडी निर्माण झाली होती. शहर व उपनगरामध्ये ठिकठिकाणी कचरा पडल्यामुळे दुर्गंधी सुटली होती. या कचऱ्यामध्ये हॉटेलमधील वेस्ट फूडचे प्रमाणही लक्षणीय होते. सध्या पोलीस बंदोबस्तामध्ये सावेडी कचरा डेपोकडे कचरा नेण्यात येत असल्याने कचऱ्याची समस्या काही काळासाठी सुटली आहे. मात्र, राधाबाई काळे महिला महाविद्यालयाने कॉलेजच्या आवारात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची समस्या कायमस्वरूपी सुटण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी त्यांनी कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती तसेच वर्मी कंपोस्ट खतनिर्मिती प्रकल्प उभारला आहे. राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये 2 हजार 200 मुली शिक्षण घेतात. या पैकी 350 मुली या कॉलेजच्या आवारात असणाऱ्या वसतिगृहामध्ये राहात असून त्यांची जेवणाची व्यवस्था (मेस) कॉलेजच्या कँटीनमध्येच आहे. या कँन्टीनमधील शिल्लक राहणारे अन्न व अन्य कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती करण्याचा प्रकल्प कॉलेजने उभारला आहे. हा प्रकल्प सुरु केल्यापासून गॅस सिलेंडरचा वापर देखील कमी झाला आहे. तसेच कॉलेजच्या आवारात पडणारा झाडांचा पालापाचोळा व इतर कचरा यासाठी कॉलेजच्या गार्डनमध्ये वर्मी कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात झाला आहे. याद्वारे निर्माण होणारे खत हे कॉलेजच्या आवारात असणाऱ्या झाडांसाठी वापरण्यात येते. एकीकडे कचऱ्याची समस्या निर्माण होत असताना, आपल्याच कॉलेजमध्ये निर्माण होणारा कचरा हा उपयोगात आणण्यासाठी उभारण्यात आलेले हे प्रकल्प इतरांसाठी आदर्शवत आहेत. महाविद्यालय परिसर त्यामुळे स्वच्छ व सुंदर दिसत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांची दूरदृष्टी महाविद्यालयाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे.

# राधाबाई काळे महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर झेप



महाविद्यालयातील यशस्वी राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी खेळाडुंसोबत रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे, प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील प्रा.बुवासाहेब ढेरे व प्रा.संजय पाटील

जिल्ह्यातील एकमेव महिला महाविद्यालय अशी ओळख असलेल्या शहरातील राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश मिळविले असून, महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीपर्यंत घेतलेली झेप महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या महाविद्यालयात जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील मुलीही निवासी उच्च शिक्षणासाठी येतात. त्यांच्या क्रीडा, कला व शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक उपक्रम घेतले जातात. यावर्षी महाविद्यालयाच्या 6 खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात राष्ट्रीय पातळीपर्यंत झेप घेतली तर व्हॉलिबॉल, कबड्डीसारख्या सांघिक क्रीडा प्रकारात राज्य स्तरावरील उपविजेतेपद पटकावले. मुली खेळाच्या क्षेत्रातही मागे नाहीत हेच या युवतींनी सिद्ध केले आहे. प्राचार्य.डॉ.दिनानाथ पाटील व क्रीडाशिक्षक प्रा. बुवासाहेब ढेरे व प्रा. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या खेळाडूंनी हे यश प्राप्त केले आहे. व्हॉलिबॉल संघाची संघनायक स्वाती शिंदे हिच्या नेतृत्वाखाली स्वाती गांगर्डे, ऋतुजा रेळेकर, श्रद्धा अन्नदाते, पल्लवी साबळे, वैशाली ठोंबरे, वर्षा पंदरकर या खेळाडूंनी पन्हाळा येथील खुल्या राज्यस्तरीय स्पर्धा व सातारा येथील 21 वर्षांखालील राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उपविजेतेपद संपादन केले. तसेच या संघातील स्वाती शिंदे ही खेळाडू आजपर्यंत कुरुक्षेत्र, बंगलोर व चेन्नई येथील राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेती ठरली आहे. कनिष्ठ विभागाच्या कबड्डी संघाने राज्यस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी केली. त्यातील शीतल मेहेत्रे, किरण वाडेकर, रोहिणी भगत यांची राज्यस्तरावर निवड झाली. तसेच कनिष्ठ विभागातील 19 वर्षाखालील व्हॉलिबॉल संघातील आकांक्षा जऱ्हाड, मोहिनी लाटे, सोनाली इथापे, वैष्णवी गटवे, पूनम डमाळे, दीपाली अनभुले, अवंतिका मचाले, पूनम शिंदे या खेळाडूंनी सासवड व कोल्हापूर येथील राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत उपविजेतेपद संपादन केले. या सांघिक यशाबरोबरच महाविद्यालयातील खेळाडू श्रद्धा वामन हिने 3 हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत लखनौ, चेन्नई, रांची, कोची, बिलासपूर, बेळगाव या ठिकाणी झालेल्या वेगवेगळ्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदके मिळविली. तेजस्वी बनसोडने 3 हजार, 5 हजार व 10 हजार मीटर जलद चालणे स्पर्धेत तामिळनाडू, गुजरात, केरळ, रांची, पुणे, रत्नागिरी,सातारा येथील स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवरील प्रकारात सुवर्णपदके व रौप्यपदके प्राप्त केली आहेत. प्रतीक्षा तापकीरने कनिष्ठ गटातून 100 व 400 मीटर धावण्याच्या स्पर्धेत जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला.

या सर्व खेळाडूंचे रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी सदिच्छा भेट देऊन कौतुक केले.

# वनस्पतिशास्त्र विभागाची साईबन येथे भेट



# राजर्षी शाहू ते शंकररावजी काळे आधुनिक महाराष्ट्रातील समाज अभियंते - ॲड.संभाजीराव मोहिते



स्व.शंकररावजी काळे यांच्या जयंती निमित्त बोलतांना ॲड.संभाजीराव मोहिते

महाराष्ट्राला महान अशा समाजसुधारकांची व प्रबोधन कारांची परंपरा लाभली असून, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा यासारख्या समाजसुधारकांनी आधुनिक महाराष्ट्राची उभारणी केली. हाच वारसा पुढे रयतच्या माध्यमातून स्व.शंकररावजी काळे यांनी चालविला म्हणूनच हे सर्व समाजसुधारक आधुनिक महाराष्ट्राचे सामाजिक अभियंता होते. असे प्रतिपादन कराड येथील ॲड.संभाजीराव मोहिते यांनी केले. महाविद्यालयात आयोजित स्व.शंकररावजी काळे जयंती निमित्त ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब औटी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय नगरकर यांनी केले. तर आभार प्रा.दशरथ शेळके यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.सचिन कोतकर यांनी केले.

# पाणी फौंडेशन अंतर्गत श्रमदान



मांजरसुंबा येथे जलसंवर्धनाचे काम करत असतांना महाविद्यालयातील विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर सेवक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पाणी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जल संधारणाची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली. त्यात राधाबाई काळे महिला महाविद्यालयाने आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मे महिन्याच्या भर उन्हात महाविद्यालयातील एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी प्रा.सहदेव आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापकांचा दररोज एक संघ व स्थानिक विद्यार्थिनी व ग्रामस्थ यांनी एकत्रित श्रमदान करून मांजरसुंबा या गावात जलसंधारण मोहीम राबविली या श्रमदानातून मांजरसुंबा या गावातील जलसंधारणाच्या कामकाजास गती मिळाली प्रा.दशरथ शेळके, प्रा.योगेश तवर, प्रा.रविप्रकाश ठोंबरे, प्रा.गफूर शेख आदिंनी ही श्रमदान मोहीम राबविण्यासाठी परिश्रम घेतले.


दि प्रेस ॲण्ड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स

नियम ८ फॉर्म नं. ९ नुसार

सदर वार्तापत्र हे खासगी वितरणासाठी असून स्वप्नील प्रिंटर्स यांचेकडून २०० अंक मुद्रीत केले आहेत.

प्रकाशन हक्क : प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील,

मुद्रण : स्वप्नील प्रिंटर्स, अ.नगर ७२७६००५४०९


# विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास



व्यक्तिमत्त्व विकास शिबिरामध्ये मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व मानशास्त्र विभागाचे डॉ.प्रीतमकुमार बेदरकर व डॉ.संतोष गायकवाड, डॉ. भूपेंद्र निकाळजे

महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ.प्रीतमकुमार बेदरकर यांनी विद्यार्थिनीस सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी यावेळी सांगितले, "विद्यापीठ हे केवळ काही विषयांच्या पुस्तकी वा बौद्धिक शिक्षणावर भर देणारे विद्यापीठ न होता, समाजसेवेचेही दीक्षापीठ व्हावे. विद्यार्थिनींना शिक्षकेतर उपक्रमांत मोकळेपणाने सहभागी होण्यास प्रवृत्त करुन त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधता यावा. त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ शिक्षणापासून वंचित असलेल्या अन्य घटकांनाही व्हावा. या प्रमुख भूमिकेतून विद्यापीठाने सदर योजना सुरु केली आहे." त्यांनी या वेळी वेगवेगळ्या उपक्रमांमधून विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांनी विद्यार्थिनींना संशोधनात्मक मार्गदर्शन केले. प्रा. संतोष गायकवाड यांनी विद्यार्थिनींस मानसशास्त्रीय टेस्ट द्वारे विद्यार्थिनींचा मानसिक आरोग्याचा अभ्यास करुन त्यांचे समुपदेशन केले.

# कला आविष्कार...



महाविद्यालयातील कला आविष्काराची पाहणी करतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ.संगिता कुलकर्णी

# रयत शिक्षण संस्थेचे गुरूवर्य डॉ.प्रतापराजे बलवंतराव चव्हाण पारितोषिक कु.तृप्ती आंबादास पंडुळे हिस...

संस्थेच्या महाविद्यालयात बी.एस्सी भाग - 3 वनस्पती शास्त्र विषयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्व प्रथम आल्या बद्दल कु.तृप्ती आंबादास पंडुळे हिस सन्मानपत्र व रोख 180/- असे या परितोषिकाचे स्वरूप होते.

# रयत शिक्षण संस्थेची 'AAA' समितीची महाविद्यालयास भेट



महाविद्यालयातील शैक्षणिक प्रशासकिय व भौतिक सुविधांची माहिती देत असतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व प्राचार्य डॉ.अशोक भोईटे प्राचार्य डॉ.किशोर काकडे

रयत शिक्षण सिंस्थेची 'AAA' त्रि सदस्यीय समितीची भेट नुकतीच महाविद्यालयास झाली या समिती मध्ये प्राचार्य डॉ.अशोक भोईटे, प्राचार्य डॉ.किशोर काकडे, डॉ.तुळशीदास आफळे हे होते. यांनी महाविद्यालयातील शै.2017-18 या वर्षातिल शैक्षणिक, प्रशासकिय व भौतिक सुविधांची पाहणी केली व त्याबाबतचा आपला अहवाल संस्थेस सादर केला.